I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 318-322 e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# सावित्रीबाई फुले यांच्या साहित्यातील मानवाधिकार

प्रा. सुरेश आर. लोनबले

मराठी विभाग प्रमुख
डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर.
*Corresponding Author: lonbale1967@gmail.com

Communicated :20.02.2022 Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 Published: 30.03.2022

**सारांश :**

क्रांतिज्योती सावित्रीबाई म्हणजे एकोणिसाव्या शतकातील स्त्रीरत्न असून त्यांनी स्त्रीशुद्राच्या आणि दीनदुबळयांच्यासाठी केलेले कार्य हे खऱ्या अर्थाने क्रांतिकार्य असून या कार्यामुळे भारताच्या सांस्कृतिक इतिहासात एक नवा आदर्श निर्माण झाला आहे. भारतातील पहिली भारतीय शिक्षिका, मुख्याध्यापिका, स्त्रीशुद्र व अनाथांची माता आणि स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या म्हणून त्यांचे जीवन अमर झाले आहे. स्त्री ही एक मानव आहे आणि पुरूषाइतकीच कर्तबगारी ती करू शकते हे सावित्रीबाईने स्वत:च्या कृतीने सिध्द करून दाखविले म्हणूनच स्त्रीपुरूष समानता प्रतिपादणाऱ्या आद्य महिला आणि स्त्रीची प्रतिष्ठा प्रतिपादन करणारी पहिली भारतीय स्त्री सावित्रीबाईच ठरते. द्वितीय महायुध्दाच्या नंतर अस्तित्वात आलेल्या युनोच्या (संयुक्त राष्ट्रसंघ) महासभेने मानवाधिकार आयोगाने तयार केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्याला मंजुरी दिली दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस म्हणून जगातील सर्वच्च देशामध्ये साजरा केल्या जातो. सदर जाहीरनामा प्रसिध्द होण्याच्या शंभर वर्षापूर्वी सावित्रीबाई फुले यांनी केलेले समाजकार्य व त्यांनी लिहिलेले साहित्य (काव्यफुले १८५४, बावनकशी सुबोध रत्नाकर १८९२) यातून मनवाधिकाराच्या व हक्काच्या पाऊलखूणा मोठया प्रमाणात जाणवतात.

**बीजशब्द :** स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहिष्णुता, मानवता, हक्क, अधिकार.

**प्रस्तावना :**

साहित्य हा समाजाचा आरसा आहे समाजात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब साहित्यिक आपल्या कल्पनाशक्तीच्या कुंचल्याने रेखाटत असतो. तत्वचिंतक संशोधक समाजाचे डोळे असतात. सर्वसामान्यांना जे कळत नाही ते तत्वज्ञानी व संशोधकांना कळत असते ते समाजातला दिशा देण्याचे काम करतात. मानव हा समाजशील प्राणी आहे. त्यांच्या संर्वागीन विकासाकरीता त्याला काही हक्क व अधिकार पाहिजे असतात. त्याशिवाय त्यांचा विकास होवू शकत नाही. समाजात वावरतांना 'बळी तो कान पिळी' अशी परिस्थिती निर्माण होऊ नये. कोणी कोणाच्या अधिकारावर गदा आणू नये, कोणी कोणाचे शोषण करू नये. व्यक्तीच्या संर्वागीन विकासाकरीता ज्या ज्या बाबी आवश्यक असतात तसेच समाजाच्या दृष्टीने त्या उचित व न्याय आहे असे वाटते त्यांनाच अधिकाराचा दर्जा प्राप्त होत असतो.

'जगा आणि जगू द्या' हा सृष्टीचा नियम आहे. या न्यायाने समाजात मानवाला काही अधिकार प्राप्त होतात. जगातील संपूर्ण मानवाचे जीवन जगण्याचा मूलाधार मानवाधिकार आहे. शासन व्यवस्थेच्या खालच्या स्तरापासून तर आंतरराष्ट्रीय पातळीवर शासनव्यवस्था व वेगवेगळया संस्थाशी मानवाधिकाराचे प्रश्न निगडित आहेत. त्यामुळेच मानवाच्या हक्क अधिकाराची ओळख करून घेण गरजेचे आहे. हक्क व अधिकार एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.

**मानवाधिकाराच्या व्याख्या:**

१. आ.जे. विसेंटच्या मते, ''प्रत्येक व्यक्तीला एक मनुष्य या नात्याने जे अधिकार प्राप्त होतात त्यांना मानवधिकार असे म्हणतात.''

२. ए.ए. सईद च्या मते, ''मानवाधिकाराचा संबंध व्यक्तीच्या प्रतिष्ठेशी आणि आत्मसन्मानाच्या भावाशी आहे. व्यक्ती मध्ये असणाऱ्या आत्म सन्मानाचा भाव हीच व्यक्तीची खरी ओळख असते आणि त्यातूनच मानवी समाजाचा विकास होत असतो.''

३. प्रा. बोझांके यांच्या मते, ''आपण ज्या समाजाचे घटक असतो त्या समाजाच्या सर्वोच्च कल्याणाच्या दिशेने आपल्या जीवनाचा विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असणारी साधने म्हणजे हक्क होय.''

४. टी.एच. ग्रीन यांच्या मते, ''मानवाच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असलेली बाहय परिस्थिती म्हणजे हक्क होय.''

उपरोक्त वाक्याच्या अनुषंगाने विचार केल्यास हक्काची निर्मिती सामाजिक परिस्थितीतून होत असते. हक्क ही मानवाची सामाजिक गरज आहे. प्रत्येक मानवाने स्वत:च्या

हक्काचा उपयोग घेतांना इतरांच्या हक्कावर अतिक्रमण होणार नाही याची काळजी घेणे हे त्याचे कर्तव्य बनते. तथापि, राज्याच्या मानत्येनंतरच व्यक्तिला खऱ्या अर्थाने हक्काचा उपभोग घेणे शक्य होते. कल्याणकारी राज्यात मानवी हक्काच्या रक्षणाची खरी जबाबदारी राज्यावर येते.

**मानवाधिकार संकल्पनेचा उदय व विकास:**

आधुनिक काळात मानवाधिकार या संकल्पनेचा उदय आणि विकास द्वितीय महायुध्दानंतरच्या काळात विविध आंतराष्ट्रीय संधी व करारामधुन झालेला आहे. संयुक्त राष्ट्र या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या स्थापनेच्या निमित्ताने झालेल्या आंतरराष्ट्रीय संमेलनात मानवी अधिकारासंबंधी विविध घोषणा करण्यात आल्या. परंतु मानवी हक्काचा जाहीरनामा मात्र १० डिसेंबर १९४८ रोजी घोषित झाला या मानवी हक्काचे तीन आधार आहेत. १.प्रत्येक मानवाचे नैतिक अस्तित्व २. विवेक शक्तीची धारणा. ३. निखळ माणूस या तीन तत्वाच्या आधारे मानवी हक्काची रचना करण्यात आली आहे. मॅक्फारले यांनी मानवाधिकाराचा अर्थ स्पष्ट करणारी पाच ठळक वैशिष्टे 'The theory and practice of Human Rights' या ग्रंथात सांगितली आहेत.

१. सर्वोच्चता (Paramount) : जनहित या आधारावर राज्य आपल्या पाशवी शक्तीचा वापर करून व्यक्तीच्या मानवी हक्कावर अतिक्रमण करू शकत नाही.

२. व्यक्तिमत्वता (Individuality) : व्यक्तीला स्वत:च्या भल्याचा किंवा वाईटासंबधीचा निर्णय घेण्याचा अधिकार असला पाहिजे.

३. सार्वत्रिकता (Universality) : जगातील कोणत्याही व्यक्ती व समूहाला कोणत्याही परिस्थितीत आणि काळामध्ये मानवाधिकार प्राप्त होण्यापासून वंचित ठेवता येत नाही.

४. क्रियान्वयन योग्य (Emforceable) : ज्या अधिकाराचे क्रियान्वयन करणे शक्य आहे अशा अधिकाराचा समावेश मानवी हक्कामध्ये होतो.

५. व्यावहारिकता (Practicability) : मानवी हक्क हे जगातील सर्व व्यक्तीसाठी आहेत तरीही ते अव्यावहारिक नसून व्यावहारिकता हे त्याचे एक ठळक वैशिष्टे आहे.

मानव हा निसर्ग सृष्टीतील सर्वश्रेष्ठ जीव मानला जातो. एक जैविक प्राणी म्हणून मानवाला अन्य मानवांप्रमाणे जगता यावे म्हणून मूलभूत हक्काची आवश्यकता आहे. यूनोच्या (संयुक्त राष्ट्रसंघ) आर्थिक सामाजिक समितीने १६ फेब्रुवारी १९४६ रोजी मानवाधिकार आयोगाची स्थापना केली. मानवी हक्काचा जाहीरनामा तयार करण्याचे काम या आयोगानेच पूर्ण केले. १० डिसेंबर १९४८ रोजी युनो संघटनेच्या महासभेने मानवाधिकार आयोगाने तयार केलेल्या मानवी हक्काच्या जाहीरनाम्याला मंजुरी दिली. दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस 'आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिवस' म्हणून जगातील सर्व देशामध्ये साजरा केला जातो.

**मानवाधिकाराचे प्रकार:**

**अ. सामान्य मानवी हक्क:**

१. जन्मत: सर्व मानव स्वतंत्र असून ते समान स्वरूपाची प्रतिष्ठा व हक्क घेऊन जन्माला येतात.

२. प्रत्येक व्यक्तीने इतराप्रती बंधुत्वाची भावना बाळगणे आवश्यक आहे.

३. कोणत्याही आधारावर व्यक्ती व्यक्तीमध्ये भेदभाव करता येणार नाही.

४. प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून ओळखले जाईल.

**ब. नागरी आणि राजकीय अधिकार:**

१. प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा, काही मूलभूत स्वातंत्र्य बाळगण्याचा आणि संरक्षणाचा हक्क आहे.

२. गुलामगिरी व गुलामाचा व्यापार निषिध्द आहे.

३. गुन्हा शाषित होईपर्यंत निर्दोष असल्याचा दावा करता येईल.

४. कायद्यापुढे सर्व समान व सर्वांना कायद्याचे संरक्षण मिळेल.

५. कोणत्याही व्यक्तीला विनाकारण कैद करण्यापासूनच संरक्षण मिळेल.

६. अमानुष छळ आणि अमानवी शिक्षा यापासून संरक्षण मिळेल.

७. मालमत्ता संपादन करण्याचा अधिकार सर्वांना राहिल.

**क. आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक अधिकार:**

१. समान कामासाठी समान वेतन मिळविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे.

२. प्रत्येक व्यक्तीला स्वत:ची प्रतिष्ठा व व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणण्याचा अधिकार राहिल.

३. कामगार संघटना व व्यावसायिक संघटना स्थापण्याचा अधिकार राहिल.

४. कामाच्या तासाची मर्यादा व सुटीच्या कालावधीचा पगार मिळवण्याचा अधिकार राहिल.

५. महिला व बालकांना विशेष सामाजिक सुरक्षा मिळविण्याचा अधिकार आहे.

६. प्रत्येकाला विज्ञान, साहित्य व कलाक्षेत्रार्तीला आपापले हितसंबध जपण्याचा अधिकार आहे.

वरील मानवाधिकाराचा अनुषंगाने सावित्रीबाई फुलेच्या सामाजिक कार्यातील लढयातून व त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त होणाऱ्या मानवधिकाराचा विचार करणार आहोत.

**सावित्रीबाई फुलेंच्या साहित्यातील मानवाधिकार:**

सावित्रीबाई फुलेंचा काळ हा विविध प्रकारच्या धर्मश्रध्दा व धार्मिक कर्मकांडाचे वर्चस्व असलेला काळ आहे. 'चूल आणि मूल' ही पारंपरिक विचारसरणी झटकून ही स्त्री साव्रजनिक कार्यासाठी बाहेर पडली असे कार्य करणारी सावित्रीबाई फुले ही महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील पहिली स्त्री होय. फुले दांपत्याने आपल्या सामाजिक कार्याची सुरूवात स्त्री शिक्षणापासून केली. स्त्री शिकली की धर्म बुडतो, अक्षराच्या अळया ताटात येऊन पडतात, सात पिढया नरकात जातात अशी विचारसरणी असणाऱ्या काळात स्वत: शिक्षण घेणे व शिक्षण देण्यासाठी शेणमातीचे, दगडधोंडयाचे मार सहन करूनही आपल्या नियत कार्यापासून मागे न ढळणं केवढे हे क्रांतीकार्य , बालहत्या प्रतिबंधक गृह चालवणे, विधवा झालेल्या मुलीच केशवपन थांबविण्यासाठी नाव्याचा संप घडवून आणणे. हे अनमोल असे कार्य केले. सावित्रीबाईंने बालहत्या प्रतिबंधक गृहातील अनेक मुलांचे मातृत्व स्विकारले.

सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणासाठी घराचा उंबरठा ओलांडणं हे तत्कालीन काळात मानवाधिकार मिळवण्यासाठी टाकलेले पहिले पाऊल आहे. सावित्रीबाईच्या काळात मानवाधिकार ही संकल्पना रूजलेली नव्हती. पण सावित्रीबाई व जोतीराव फुले हे सर्व मानवांना समान समजत असत. जाती धर्माची बंधने त्यांनी झुगारून दिली म्हणजेच मानवाधिकाराचा जाहीरनामा अस्तित्वात येण्याच्या शंभर वर्षापूर्वीच शुद्रातिशूद्रांना मानव म्हणून जगता यावे धर्माच्या रूढीच्या नावाने सामान्य जनाची पीळवणूक होऊ नये यासाठी सावित्रीबाई झटत होत्या.

''शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा''

'शुद्राचे दुखणे' या कवितेतून सावित्रीबाई भारतातील शुद्रांना आपल कल्याण करण्याकरीता शिक्षण घेणे म्हणजेच मानवाची पशुत्वातून मुक्ती होय असा संदेश देत होत्या. ब्राम्हणी व्यवस्थेच्या गुलामगिरीतून शुद्रांना मुक्त करणे हे मानवतावादाचे मूल्य त्याच्या कवितेत दिसून येते.

पृथ्वीवरील मानवप्राणी निसर्गदृष्टया एकच आहे. सर्व मानवाचे कल्याण व्हावे हे सुत्र त्यांच्या 'मानव व सृष्टी' या कवितेत दिसते.

''मानवप्राणी निसर्गसृष्टी व्दय शिक्क्याचे नाणे
एकच असे ते म्हणूनि सृष्टीला शोभवू मानव लेणं''

सुंदर मानव सुंदर सृष्टीची देण आहे प्रतये मानवाचे जीवन सद्‌भावाच्या पर्जन्याने बहरून टाकून मानवा मानवात एकात्मता निर्माण करणे हे सावित्रीबाईने स्वत:च्या कृतीने सिध्द करून दाखविले म्हणूनच स्त्रीपुरूष समानता प्रतिपादणाऱ्या आद्य महिला आणि स्त्रीची प्रतिष्ठा प्रतिपादन करणारी पहिली भारतीय स्त्री सावित्रीबाईच ठरते.

क्रांतिज्योती सावित्रीबाई फुलेंच्या काळात धर्म व्यवस्थेचा पगडा, समातावर जातीभिमानाच्या प्रभावामुळे शुद्रांचे जीवन जगणे कठीण झाले होते. भारतातील लोकांचे भरणपोषण करणारा शेतकरी मठ्ठ असतो, पूर्व जन्मीच्या पापाचे प्रायश्चित म्हणून तो शेतीत श्रम करून पाप फेडतो हे सांगणे मानवतावादाच्या दृष्टिने अयोग्य आहे. याचा समाचार घेतांना सावित्रीबाई म्हणतात.

विषम रचती। समाजाची शेती
धूर्ताची ही नीती। अमानव।

मनुवादी धूर्त लोकांनी आपल्या स्वार्थासाठी विषमतावादावर आधारित अशी समाजरचना निर्माण केल्याचे सावित्रीबाई सांगतात. आधुनिक काळात व्यक्तिमत्व विकसित होण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता आहे शिक्षण हे सर्वात मोठे धन आहे. या धनाशिवाय मानवाचा तरनोपाय नाही असे सावित्रीबाई म्हणतात.

'विद्या हे धन आहे रे। श्रेष्ठ साऱ्या धनाहून।
तिचा साठा जया पाशी। ज्ञानी तो मानती जन।

अज्ञानी माणूस हा कोणत्याही कामाचा नाही. सज्ञानी माणूस हाच खऱ्या अर्थाने माणूस म्हणून ओळखला जातो. म्हणून प्रत्येकाने विद्यारूपी धन प्राप्त करण्यासाठी झटावे असे सावित्रीबाई म्हणतात. तत्कालिनकाळात इंग्रजांचे शासन असल्यामुळे पेशवाई काळात निर्माण झालेले भेदभाव मिटण्यासं मदत झाली त्या दृष्टिने इंग्रजी शासनामुळे शुद्रांना चांगले जीवन जगण्यासाठी संधी मिळाली याची दखल त्या 'इंग्रजी माऊली' या कवितेत घेतात.

मानवाधिकार जाहीरनाम्यातील जात, धर्म, वंश, लिंग या आधारावर भेदाभेद केला जाऊ नये असे तत्व आहे. प्रत्येक मानवाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे माणूस स्वालंबी झाला पाहिजे त्या करीता जातीभेदविरहित समाजरचना निर्माण होण्यासाठी सावित्रीबाई म्हणतात.

'इंग्रजी शिकूनि। जातीभेद मोडा।
भटजी भारूडा फेकुनिया'

सामाजिक भेदाभेद मिटविण्यासाठी वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले इंग्रजी शिक्षण घेऊन समाज समतावादी व्हावा ही सावित्रीबाईची अपेक्षा होती. सजीव सृष्टीचा घटक या नात्याने माणूस कसा असावा ज्ञान व बुध्दी जागृत असलेला, जीवन जगण्याकरीता झटणारा उद्योगी असावा. विद्येच्या प्रसाराशिवाय भारतासारखे मुर्दाड बनलेले राष्ट्र कधीही जागे होणार नाही. सावित्रीबाई गुलामगिरीवर प्रहार

करतांना म्हणतात. ''दोन हजार वर्षे अतिशुद्र लोकांस श्रेष्ठ लोकांनी ज्ञान, संपत्ती आणि सत्ता यापासून दूर ठेवले यामुळेच परकीयांनी देशावर स्वाऱ्या करून श्रेष्ठ लोकांना जिंकले.'' असे श्रेष्ठींना ठणकावून सांगण्याची क्षमता त्यांच्यात होती. कर्मानेच मानवाची श्रेष्ठता किंवा कनिष्ठता ठरविली पाहिजे जात, धर्म, पंत यावरून ठरवू नये. तत्कालीन समाज हा आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक अशा सर्वच प्रकारच्या गुलामगिरीत खितपत पडला होता. त्या विरूध्द सावित्रीबाईने संघर्ष केला. स्त्री शिक्षण, शुद्र—अतिशुद्रांचे शिक्षण, धंदे शिक्षण अश्याक्रमाची पुनर्रचना, शेतीशिक्षण, तांत्रिकशिक्षण, शिक्षण—प्रशिक्षण या सर्वच बाबतीत जे विचार मांडले आहेत ते आजही उपयोगाचे आहे.

आज अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य शिक्षण आणि रोजगार या मानवाच्या आवश्यक गरजा आहेत. त्यापासून कोणी वंचित राहू नये असे सावित्रीबाईंना वाटते. इ.स. १८७६—७७ साली दुष्काळात सावित्रीबाईनी मोलाची कामगिरी केली. सत्यशोधक समाजामार्फत छात्रालये उघडून २००० मुलामुलींची या ठिकाणी जेवणाची व्यवस्था केली या सर्व छात्रालयाचा कारभार माता सावित्रीबाई पाहत होत्या. दिवसभर न थकता उद्योग करणे हा मनुष्याचा उत्तम धर्म असून तो त्याचा खरा कल्याण करणारा मित्र होय या मित्राशिवाय कल्याण करणारा दुसरा कोणी मित्र जगाच्या पाठीवर नसतो याची प्रत्येकांनी खुणगाठ बांधून ठेवण्याचा सलला सावित्रीबाईने कृतीतून दिला.

सावित्रीबाई फुले यांनी जोतीराव फुले यांना दोन पत्रे (१८६८, १८७७) लिहीली होती त्या पत्रातूनही मानवाधिकार ओसंडून वाहतांना दिसते. त्यांनी भावासोबत झालेला संवाद जोतीरावांना कळविला तो असा, ''भाऊ तुझी बुध्दी कोती असून भट लोकांच्या शिकवणूकीने दुर्बल झाली आहे. तू शेळी, गाय, यांना जवळ घेऊन कुरवाळतोस, नागपंचमीस विषारी नाग पकडून त्यास दूध पाजतोस, महारमांग हे तुझ्यासम मानव असतां त्यांस अस्पृश्य समजतोस त्याचे कारण सांग. भट लोक सोवळयात असता तुझा विटाळ मानतात. तुला महार समजतात. महारमांगानी शिकावे व माणूस म्हणून जगावे या कारणास्तव भटगुळांशी झगडा खटाटोप करणारे जोतिबा स्वामी महारमांगाना शिकवितात व मी ही त्यास शिकविते. पण त्यात अनुचित काय आहे?'' फुले दांपत्याने स्त्रीशुद्र हे अज्ञानाच्या पांघरूणात झोपले असता त्यांना जागे केले ज्ञानाचे डोस दिले त्यांना चालू असलेल्या समाजाविरूध्द बंड उभारण्यास शिकविले'' वरील मजकुरावरून सावित्रीबाई मानवाच्या कल्पनाचा किती विचार करतात हे लक्षात येते.

आज आपल्याला शिक्षण सहज मिळते. म्हणून त्या शिक्षणाचे महत्व कळत नाही फुले दांपत्याने ज्या उद्देशाने शिक्षण घेण्याचे आवाहन केले होते ते विषमतावाद, ब्राम्हणशाही, जातीवाद, अंधश्रध्दा गाडण्यासाठी मानवाधिकाराचा जाहीरनामा प्रसिध्द होण्यापूर्वीच सावित्रीबाईंना मानवतावाद ज्ञान असल्याचे दिसते. त्या काळी महात्मा फुले, सावित्रीबाई हे सर्व सुबोध, रसाळ, प्रवाही मराठी रचना करीत होते. त्यांना तेथील लोकमत कळले होते. त्यांना लोकगीताची परंपरा संतसाहित्याची परंपरा त्यांना माहित होती. त्यांना मानवतावाद पाश्चात्याकडून शिकण्याची गरज नव्हती. कारण तो संतपरंपरेत तो होताच लोकपरंपरा, लोकनिष्ठा, लोकभिमुखता यामुळे इंग्रजी वाघीनीचे दूध प्यालेल्या मराठीचे शिवाजी विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि आधुनिक मराठीचे जनक केशवसुत यांच्यापूर्वी सावित्रीबाईनी केलेले काव्यलेखन आधुनिकता सन्मुख जाणिवांचा अविष्कार करणारे आहे.'' या श्रीराम गुंदेकरांच्या अभिप्रायातून सावित्रीबाई फुले याच्यात माणूकीचा वा मानवतावादाचा झरा सतत वाहत होता हे लक्षात येते.

स्त्रीशुद्राच्या उन्नतीसाठी शिक्षणाचे, ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या सावित्रीबाईंना जीव तोडून विरोध करण्याचे काम ब्राम्हण वर्गाने केले. या धर्मांध ब्राम्हणवर्गाला आपल्याच जातीतील स्त्रीया व कोवळया मुलींचे दु:ख दिसले नाही पण मानवतावादी हद्य असणाऱ्या क्रांतिज्योतीला ब्राम्हण स्त्रीया व मुलींचे अश्रू दिसले. सनातन्याच्या मुली व भगिनीचे असहाय हुंदके फुले दांपत्याला ऐकू आले व त्यांनी त्यांना नवजीवन दिले. फुले दांपत्याला ब्राम्हण विरोधी ठरवणाऱ्यांनी सद्सदविवेकबुध्दीने विचार केला तर ते कसे ब्राम्हण विरोधी नव्हते हे त्यांच्या लक्षात येईल. सवित्रीबाई फुले सर्वप्रकारच्या विषमतावादी रूढी, परंपरा व संस्कार विरोधी होते. त्याचा लढा हा मूलगामी माणूसकीसाठी होता. सावित्रीबाई एका भाषणात म्हणतात. ''सर्व मानव एकाच ईश्वराची लेकरे आहेत हे जोपर्यंत आपणास कळत नाही तो पर्यंत ईश्वराचे खरे स्वरूप कळणार नाही आपण सारे मानव प्राणी भाऊ भाऊ आहोत असे वाटणे हे ईश्वर ओळखण्याच्या मार्गातील महत्वाचे चिन्ह आहे.

भारतातील पहिल्या शिक्षिका स्त्रिमुक्ती चळवळीच्या पहिल्या नेत्या, पददलितांच्या कैवारी आणि प्रौढ शिक्षणाचा पुरस्कर्त्या म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्थान अढळ आहे. एका अशिक्षित स्त्रीने शिक्षण घेऊन शिक्षिका

बनावे आणि वर्षानुवर्षे अज्ञानाच्या अंधकारात चाचपडणाऱ्या स्त्रीशुद्रांना ज्ञानाचा प्रकाश दाखवावा ही गोष्ट भारताच्या दोन हजार वर्षाच्या इतिहासात अपूर्व अशी आहे.

**निष्कर्ष:**

१. मानव हा जन्मताच स्वतंत्र आहे.

२. निसर्गसृष्टीचा घटक या नात्याने प्रत्येक मानवाला काही हक्क आपोआपच प्राप्त झाले पाहिजे.

३. मानवाधिकार व्यवहार्य असले पाहिजे.

४. शिक्षणामुळेच मानवाचा व्यक्तिमत्व विकास होतो.

५. सावित्रीबाईचे साहित्य मानवतावादाचा झरा आहे.

६. सावित्रीबाईचे मानवाधिकार विषयक विचार प्रत्यक्षानुभवातून स्फुरलेले आहेत.

**संदर्भ :**

भारतातील स्थानिक स्वशासन – रा.ज. लोटे, पिंपळापुरे ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स, नागपूर, द्वितीय आवृती २०१४

मानवी हक्क – प्रा. व्ही.बी.पाटील, के सागर पब्लिकेशन, पुणे, नववी आवृत्ती २०१३

क्रांतिज्योजी सावित्रीबाई जोतीराव फुले – डॉ. मा.गो. माळी, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, तृतीय आवृत्ती १९९७

युगस्त्री सावित्रीबाई फुले – राजराम सुर्यवंशी, मावळाई प्रकाशन, पुणे, तृतीय आवृत्ती २०१०

सवित्रीबाई फुले काळ आणि कर्तृत्व – संपादक डॉ. मा. गो. माळी, प्रकाशक महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई पाचवी आवृत्ती २०११